**Dy.Commissioner of Police, Zone 1,**
WalchandHirachandMarg, Fort, Mumbai-400001.
**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मुंबई.**
वालचंदहिराचंदमार्ग, फोर्ट, मुंबई– ४००००१.
E mail ID - dcpzone1-mum@mahapolice.gov.in
Tel:- 022 22620453 Fax :- 022 22671408

सदैव तत्पर, सदैव मदतीस

जा.क्र. ८७२/पोउआ/परि–१/वा./२०१९ दिनांक – ०३/०४/२०१९

प्रति,
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई

**विषय** – न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरूध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या बैठकांचे इतिवृत्त..

**संदर्भ** – शासन निर्णय क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र.५१/पोल – १०, दि. १७/१०/२०१५

उपरोक्त विषयास अनुसरून अहवाल सादर करण्यात येतो की, दि. २५/०८/२०१८ ते दिनांक १८/०१/२०१९ या कालावधीमध्ये पोलीस उप–आयुक्त, परिमंडळ–१ कार्यालयामध्ये न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरूध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या एकूण ६ बैठकांचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीकरिता परिमंडळ–१ मधील सर्व पोलीस ठाण्यांचे पोलीस निरिक्षक (गुन्हे), विधी अधिकारी, परिमंडळ–१ इत्यादी सदस्य उपस्थित होते. समितीच्या बैठकींमध्ये परिमंडळ–१ मधील दोषमुक्त झालेल्या ११ खटल्यांच्या न्यायनिर्णयांची तपासणी करणात आली.

खालील तक्त्यातील समितीने दोषी ६ तपासी अधिकारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबतचे प्रस्ताव मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई यांना पाठवले आहेत.

सदरचा अहवाल माहितीकरिता सादर करण्यात येत आहे.

**( अभिषेक त्रिमुखे )**
पोलीस उप–आयुक्त
परिमंडळ–१, मुंबई

**आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय** :– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ –१, मुंबई

**समितीच्या बैठकीचा दिनांक** :– दिनांक २५/०८/२०१८, २९/०९/२०१८, २३/१०/२०१८, २०/११/२०१८, २३/१२/२०१८, १८/०१/२०१९

| अ.क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरूध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेशन केस नं. ११/२०१३ सेशन कोर्ट नं. २५ न्यायाधीश श्री. दिनश कोधळीकर | जे.जे.मार्ग पो. ठाणे गु.र.क्र. १३०/२०१२, कलम ३०४, ३१४ भादवि सह ३ व ४ मेडीकल डर्मिनेश ऑफ प्रेगन्नसी ॲक्ट १९७१ | ०८/०७/२०१३ | १९/१०/२०१८ | तपासी अधिकारी यांनी बळीत व्यक्तीचा शवविच्छेदन अहवाल न्यायालयात सादर न केल्यामुळे | तपासी अधिकारी जबाबदार | पोलीस निरीक्षक सुरेश पाटील, सर जे.जे.मार्ग पोलीस ठाणे जा.क्र. ५७५/१९, दिनांक ०५/०३/१९ अन्वये मा. अपोआ, दप्रावि, मुंबई यांचेकडे कारवाई करीता अहवाल सादर केला आहे. | |

| अ.क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरूध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | एन.डी.पी.एस. स्पेशल केस नं. १४२/२०१५ स्पेशल कोर्ट नं. ४४ न्यायाधीश एस.आर. तांबोळी | डोंगरी पो.ठाणे गु.र.क्र. ११३/२०१५, कलम ८(क), २२ एन.डी. पी.एस ॲक्ट | १२/०८/२०१५ | ०३/०५/२०१७ | गुन्हयातील न्यायालयीन प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने एनडीपीएस कायदयाचे कलम ५० च्या प्रोसेजर नुसार कार्यवाही केलेली तसेच मा. उच्च न्यायालयाने दिलेला न्यायनिवाडा श्री. धर्मवीर खटल्यामधील मार्गदर्शक सुचनांचे अनुपालन केलेले न्यायालयाला दिसून आले नाही. तसेच तपासी अधिकारी सपोनि अरूण थोरात यांनी गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल रासायनिक परीक्षणासाठी तात्काळ न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेला न पाठवता २० दिवस विलंबाने पाठवला तसेच झालेल्या विलंबाबाबत मा. न्यायालयासमोर संयुक्तिक उत्तरे दिली नाहीत. यामध्ये तपासी अधिकारी यांचा तपास अयोग्य असल्यामुळे न्यायालयाने आरोपीला दोषमुक्त केले आहे. | तपासी अधिकारी जबाबदार | सहा. पोलीस निरीक्षक अरूण थोरात, डोंगरी पोलीस ठाणे जा.क्र. ५७५/१९, दिनांक ०५/०३/१९ अन्वये मा. अपोआ, दप्रावि, मुंबई यांचेकडे कारवाई करीता अहवाल सादर केला आहे. | |

| अ.क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरूध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | स्पेशल केस क्र. –२/पीडब्ल्यू /२००६ ७० वे न्यायालय, माझगांव, मुंबई | डोंगरी पोलीस ठाणे कलम ५१, ५२(अ) कॉपी राईट ॲक्ट | ०९/०१/२००६ | ०२/०१/२०१८ | नमूद खटल्यामध्ये तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक शेंडे यांनी आरोपीच्या सीडी डिव्हीडी विक्रीच्या परवान्याचे व्हेरिफिकेशन केले नाही. ओरिजिनल आणि ड्युप्लिकेट सीडी,डीव्हीडी यांच्या कॉपीराईटची पडताळणी केली नाही तसेच गुन्ह्यामधील जप्त मुद्देमाल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा येथे रासायनिक परीक्षणासाठी पाठवला नाही. त्यामुळे सबळ पुराव्याअभावी न्यायालयाने आरोपीला दोषमुक्त केले आहे. | तपासी अधिकारी जबाबदार | पोलीस उप निरीक्षक शेंडे जा.क्र. ५७५/१९, दिनांक ०५/०३/१९ अन्वये मा. अपोआ, दप्रावि, मुंबई यांचेकडे कारवाई करीता अहवाल सादर केला आहे. | |

| अ.क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरूध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | सेशन केस क्र. –७२५/२०१६ सेशन कोर्ट नं. २४ न्यायाधीश श्री. एम.टी. असीम | सर जे.जे. मार्ग पोलीस ठाणे गु.र.क्र. १५५/२०१६, कलम ३६४, ३०२ भादवि | २१/१०/२०१६ | ०१/०८/२०१८ | नमूद खटल्यामध्ये तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक, नेताराम मस्के यांनी गुन्ह्यातील संशयित मोबाईल क्रमांकाचे सीडीआर, एसडीआर व आयएमइआय क्रमांकाची माहिती तसेच सदरचा मोबाईल क्रमांक कोण व्यक्ती वापरत होता, संशयित मोबाईल क्र.कोणाशी संबंधित आहे याबाबतची माहिती मा. न्यायालयासमक्ष सादर न केल्यामुळे भा.पु.का. कलम २७ नुसार सिद्ध होऊ शकले नाही.<br>अभियोग पक्ष या खटल्यात परिस्थितीजन्य पुरावा व गुन्ह्याची साखळी तसेच आरोपीनेच बळीत मुलाचे अपहरण करून खून केल्याचे सिद्ध करू शकले नाहीत. नमूद खटल्यामध्ये तपासी अधिकारी यांनी तपासामध्ये हलगर्जीपणा केल्यामुळे नमूद गुन्ह्यांतील आरोपी हे निर्दोषमुक्त झालेले आहेत. | तपासी अधिकारी जबाबदार | पोलीस निरीक्षक, नेताराम मस्के, सर जे. जे. मार्ग पोलीस ठाणे जा.क्र. ५७५/१९, दिनांक ०५/०३/१९ अन्वये मा. अपोआ, दप्रावि, मुंबई यांचेकडे कारवाई करीता अहवाल सादर केला आहे. | |

| अ.क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरूध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | सेशन केस क्र. –१४५/२००९<br>सेशन कोर्ट नं. २५<br>न्यायाधीश श्री. दिनेश कोधळीकर | मा.र.आं मार्ग पोलीस ठाणे गु.र.क्र. २०२/०५, कलम २५५, २५९, २६९, ४६५, ४६३, ४६८, ४७१, ४१९, ४२०, १२० ब, ३४ भादवि | २७/०२/२००९ | ०१/११/२०१८ | नमूद गुन्ह्यातील न्यायालयीन प्रकरणामध्ये या खटल्यामध्ये आरोपीकडे २००३ साली गुन्ह्यातील संशयास्पद स्टॅंपपेपर होता की, तो बनावट स्टॅंप आरोपीने दिला होता तसेच फसवणुकीच्या उद्देशाने सदरचे करार केले हे सिद्ध करता आले नाही. आरोपी क्र. ३ याने इतर आरोपींच्या मदतीने २० लाखांचे कर्ज काढले याबाबतचा पुरावा तपासी अधिकारी कोर्टात सादर करू शकले नाहीत. तपासी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक भोळे व सहायक पोलीस निरीक्षक भामरे यांनी नॅशनल को.ऑप. बॅंक, फोर्ट शाखा या बॅंकेत खोटे अग्रीमेंट केल्याबाबत चौकशी केली नाही त्यामुळे न्यायालयाने सदर खटल्यातील आरोपींना दोषमुक्त केले आहे. | तपासी अधिकारी जबाबदार | सहायक पोलीस निरीक्षक भोळे व सहायक पोलीस निरीक्षक भामरे, मा.र. आं.मार्ग पोलीस ठाणे जा.क्र. ५७५/१९, दिनांक ०५/०३/१९ अन्वये मा. अपोआ, दप्रावि, मुंबई यांचेकडे कारवाई करीता अहवाल सादर केला आहे. | |

| अ.क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरूध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | एस.सी/एस.टी स्पेशल केस क्र. –१०/२०१० स्पेशल कोर्ट नं. २३ न्यायाधीश श्री. आर.एम. सद्रानी | मा.र.आं मार्ग पोलीस ठाणे गु.र.क्र. १६४/०५, कलम २९४, ५०९ भादवि सह ३(१)(एक्स) एस.सी. ॲण्ड एस.टी. ॲक्ट १९८९ | २६/०७/२०१० | २२/१०/२०१८ | या खटल्यामध्ये तपासी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक भोळे व सहायक पोलीस निरीक्षक भामरे यांनी पॉर्न पिक्चर बुक आरोपीकडून जप्त करणे पुराव्याच्या दृष्टीने आवश्यक होते परंतु, तपासी अधिकारी यांनी ते पुस्तक पुराव्याच्या दृष्टीकोनातून जप्त केले नाही. त्यामुळे सबळ पुराव्याअभावी आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले आहे. | तपासी अधिकारी जबाबदार | सहायक पोलीस निरीक्षक भोळे व सहायक पोलीस निरीक्षक भामरे, मा.र.आं.मार्ग पोलीस ठाणे जा.क्र. ५७५/१९, दिनांक ०५/०३/१९ अन्वये मा. अपोआ, दप्रावि, मुंबई यांचेकडे कारवाई करीता अहवाल सादर केला आहे. | |